# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## रास पंचाध्याय (10.30)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**दशमः स्कंधः**

**अथ त्रिं(म्)शोऽध्यायः**

**श्रीशुक उवाच**

अन्तर्हिते भगवति, सहसैव व्रजाङ्गनाः ।
अतप्यं(म्)स्तमचक्षाणाः(ख्), करिण्य इव यूथपम् ॥ 1॥

अतप्+ यं(म्)स्त+ मचक्षाणाः(ख्)

श्रीशुक म्हणतात- भगवान अचानकपणे अंतर्धान पावले, तेव्हा गजराजाविना हत्तीणी जशा दुःखी होतात, तशा व्रजयुवती ते दिसत नाहीत, असे पाहून दुःखाने व्याकुळ झाल्या. ॥ 1 ॥

गत्यानुरागस्मितविभ्रमेक्षितैर् -
मनोरमालापविहारविभ्रमैः ।
आक्षिप्तचित्ताः(फ्) प्रमदा रमापते-
स्तास्ता विचेष्टा जगृहुस्तदात्मिकाः ॥ 2॥

गत्या+ नुरागस् + मितविभ्रमे+ क्षितैर्, मनो+ रमाला+ पविहा+ रविभ्रमैः

आक्षिप्त+ चित्ताः(फ्), जगृहुस् + तदात् + मिकाः

श्रीकृष्णांची चाल, प्रेम पूर्णस्मित हास्य, विलास युक्त नेत्रकटाक्ष, मनोरम प्रेमलाप, वेगवेगळ्या प्रकारच्या लीला आणि हावभाव यांनी त्यांचे चित्त वेधून घेतले होते. त्यामुळे श्रीकृष्ण मय झालेल्या गोपी त्यांच्या वेगवेगळ्या कृतींचे अनुकरण करू लागल्या. ॥ 2 ॥

**गतिस्मितप्रेक्षणभाषणादिषु,**

**प्रियाः(फ्) प्रियस्य प्रतिरूढमूर्तयः ।**

**असावहं(न्) त्वित्यबलास्तदात्मिका,**

**न्यवेदिषुः(ख्) कृष्णविहारविभ्रमाः ॥ 3॥**

गतिस् + मितप्रे+ क्षणभा+ षणादिषु, त्वित् + यबलास्+ तदात्मिका, कृष्णविहा+ रविभ्रमाः

आपल्या प्रियतमाच्या चालण्याची लकब, हास्य, पाहाणे, बोलणे इत्यादी बाबतीत त्या गोपी त्यांच्यासारख्याच होऊन गेल्या, त्यांच्या शरीरामध्ये तीच हालचाल, त्याच भाव-भावना उतरल्या. त्या स्वतःला संपूर्णपणे विसरून श्रीकृष्ण स्वरूप होऊन गेल्या आणि त्यांच्याच लीला विलासाचे अनुकरण करीत "मीच श्रीकृष्ण आहे"असे म्हणू लागल्या. ॥ 3 ॥

**गायन्त्य उच्चैरमुमेव सं(म्)हता,**

**विचिक्युरुन्मत्तकवद् वनाद् वनम् ।**

**पप्रच्छुराकाशवदन्तरं(म्) बहिर्-**

**भूतेषु सन्तं(म्) पुरुषं(वँ) वनस्पतीन् ॥ 4॥**

विचिक्+ युरुन्+ मत्तकवद्, पप्रच्+छुराका+ शवदन्तरं(म्)

त्या सर्वजणी एकत्र येऊन उच्च स्वरात त्यांच्याच गुणांचे गायन करीत वेड्यासारख्या एका वनातून दुसऱ्या वनात त्यांना शोधू लागल्या. श्रीकृष्ण सर्व जड- चेतन पदार्थांमध्ये आकाशाप्रमाणे आत बाहेर व्यापलेले असूनही गोपी मात्र वनस्पतींना त्यांचा ठावठिकाणा विचारू लागल्या. ॥ 4 ॥

**दृष्टो वः(ख्) कच्चिदश्वत्थ, प्लक्ष न्यग्रोध नो मनः ।**

**नन्दसूनुर्गतो हृत्वा, प्रेमहासावलोकनैः ॥ 5॥**

कच्चिदश् + वत्थ, नन्दसू+ नुर्गतो

"हे पिंपळा! हे पिंपरे! हे वटवृक्षा! नंदन नंदन आपल्या प्रेमपूर्ण स्मितहास्याने आणि नेत्रकटाक्षांनी आमचे मन चोरून घेऊन गेले आहेत. तुम्ही त्यांना पाहिलेत काय? ॥ 5 ॥

**कच्चित् कुरबकाशोक- नागपुन्नागचम्पकाः ।**

**रामानुजो मानिनीना- मितो दर्पहरस्मितः ॥ 6॥**

नागपुन्ना+ गचम्पकाः

हे कोरांटे! अशोका! नागकेशरा! पुन्नागा! चाप्या! ज्यांच्या केवळ स्मितहास्याने माननींचा मान धुळीला मिळतो, ते बलरामाचे धाकटे भाऊ येथे आले होते काय? ॥ 6 ॥

कच्चित्तुलसि कल्याणि, गोविन्दचरणप्रिये ।

सह त्वालिकुलैर्बिभ्रद्- दृष्टस्तेऽतिप्रियोऽच्युतः ॥ 7॥

त्वा+ लिकुलैर्+ बिभ्रद्, दृष्टस्तेऽ+ तिप्रियोऽ+ च्युतः

हे कल्याण करणाऱ्या तुळशी! भगवंतांच्या चरणांना तू आवडतेस. म्हणूनच भ्रमर पिंगा घालीत असूनही ते तुझी माळ घालतात. तू आपल्या प्रियतमा अच्युत आला पाहिलेस काय? ॥ 7 ॥

मालत्यदर्शि वः(ख्) कच्चिन्- मल्लिके जाति यूथिके ।

प्रीतिं(वँ) वो जनयन् यातः(ख्), करस्पर्शेन माधवः ॥ 8॥

हे मालती! मल्लिके! जाई आणि जुई! प्रिय माधवाला तुम्ही पाहिलेत काय? आपल्या हातांनी स्पर्श करून तुम्हाला आनंदी करिते येथून गेले असणार! ॥ 8 ॥

चूतप्रियालपनसासनकोविदार-

जम्ब्वर्कबिल्वबकुलाम्रकदम्बनीपाः ।

येऽन्ये परार्थभवका यमुनोपकूलाः(श्),

शं(म्)सन्तु कृष्णपदवीं(म्) रहितात्मनां(न्) नः ॥ 9॥

चूतप्रिया+ लपनसा+ सनको+ विदार, जम्ब्वर्क+ बिल्व+ बकुला+ म्रकदम् + बनीपाः

आम्रवृक्षा! चारा! फणसा! असण्या! कांचना! जांभळा! रुई! बेला! बकुळा! आम्रा! कदंबा! दुपारी! तसेच इतर यमुनेच्या तीरावर असलेल्या परोपकारी वृक्षांनो! श्रीकृष्णांशिवाय सुन्या झालेल्या मला त्यांचा मार्ग सांगा. ॥ 9 ॥

किं(न्) ते कृतं(ङ्) क्षिति तपो बत केशवाङ्घ्रि-

स्पर्शोत्सवोत्पुलकिताङ्गरुहैर्विभासि ।

अप्यङ्घ्रिसम्भव उरुक्रमविक्रमाद् वा,

आहो वराहवपुषः(फ्) परिरम्भणेन ॥ 10॥

स्पर्शोत्+ सवोत्+पुलकिताङ्+ गरुहैर्विभासि

हे पृथ्वीदेवी! तू अशी कोणती तपश्चर्या केली आहेस की, ज्यामुळे श्रीकृष्णांच्या चरण स्पर्शाच्या आनंदाने गवत वेली इत्यादीच्या रूपाने अंगावर आलेले रोमांच प्रगट करीत आहेस! तुझा हा आनंद श्रीकृष्णांच्या चरणस्पर्शामुळे आहे की, वामनावतारामध्ये त्यांनी तुला चरणाने मोजले होते, त्यामुळे आहे? की त्याही अगोदर वराहांच्या अंग स्पर्शाने तुझी ही स्थिती झाली नाही ना? ॥ 10 ॥

अप्येणपत्न्युपगतः(फ्) प्रिययेह गात्रैस्-

तन्वन् दृशां(म्) सखि सुनिर्वृतिमच्युतो वः ।

कान्ताङ्गसङ्गकुचकुं(ङ्)कुमरं(ञ्)जितायाः(ख्),

कुन्दस्रजः(ख्) कुलपतेरिह वाति गन्धः ॥ 11॥

अप्ये+ णपत्+ न्युपगतः(फ्),

कान्ताङ्ग+ सङ्ग+ कुचकुं(ङ्)+ कुमरं(ञ्)+ जितायाः(ख्)

अगं गडे हरीणी! आपल्या शरीर दर्शनाने तुमच्या डोळ्यांना परमानंदाचे दान करीत श्रीकृष्ण आपल्या प्रिय सह येथून तर गेले नाहीत ना? कारण त्यांच्या कुंद कळ्यांच्या माळेचा सुगंध येथे येऊ लागला आहे. जी माळ त्यांच्या प्रियेच्या अंग स्पर्शाच्या वेळी लागलेल्या स्तनावरील केशराने केशरी झालेली आहे. ॥ 11 ॥

## बाहुं(म्) प्रियां(म्)स उपधाय गृहीतपद्मो,

## रामानुजस्तुलसिकालिकुलैर्मदान्धैः ।

## अन्वीयमान इह वस्तरवः(फ्) प्रणामं(ङ्),

## किं(वँ) वाभिनन्दति चरन् प्रणयावलोकैः ॥ 12॥

रामा+ नुजस् + तुलसिका+ लिकुलैर् + मदान्धैः

हे वृक्षांनो! तुळशीच्या सुगंधाने धुंद झालेले भ्रमर ज्यांचा पाठलाग करीत आहेत, ज्यांच्या एका हातात कमळ आणि दुसरा हात प्रेयेच्या खांद्यावर ज्यांनी ठेवलेला असेल, ते बलरामाचे धाकटे बंधू विहार करीत येथून गेले असतील. तुम्ही त्यांना वंदन करण्यासाठी झुकलेले असताना त्यांनी आपल्या प्रेम पूर्ण नजरेने तुमच्या वंदनाचा स्वीकार केला असेल ना? ॥ 12 ॥

## पृच्छतेमा लता बाहू- नप्याश्लिष्टा वनस्पतेः ।

## नूनं(न्) तत्करजस्पृष्टा, बिभ्रत्युत्पुलकान्यहो ॥ 13॥

तत् + करजस्+ पृष्टा, बिभ्रत्युत् + पुलकान्यहो

अग सख्यांनो! या वेलींना विचारा बरे! वृक्षरुप पतीच्या भुजांनी यांना अलिंगन दिले असेल, तरी यांच्या शरीरावर जे कळ्या रुपी रोमांच उभे राहिले आहेत, ते भगवंतांच्या नखांच्या स्पर्शामुळेच आहेत ना!॥ 13 ॥

## इत्युन्मत्तवचो गोप्यः(ख्), कृष्णान्वेषणकातराः ।

## लीला भगवतस्तास्ता, ह्यनुचक्रुस्तदात्मिकाः ॥ 14॥

इत्युन्मत्+ तवचो, ह्यनुचक्रुस् + तदात्मिकाः

याप्रमाणे वेड्यासारखे बडबडणाऱ्या गोपी श्रीकृष्णांना धुंडीत असताना व्याकुळ होत होत्या. आता तर त्या भगवन्मय होऊन भगवंतांच्या निरनिराळ्या लीलांचे स्वतः अनुकरण करू लागल्या.॥ 14 ॥

## कस्याश्चित् पूतनायन्त्याः(ख्), कृष्णायन्त्यपिबत् स्तनम् ।

## तोकायित्वा रुदत्यन्या, पदाहञ्छकटायतीम् ॥ 15॥

कृष्णा+ यन्त्य+ पिबत्, पदाहञ् + छकटा+ यतीम्

एक पूतना झाली तर दुसरी श्रीकृष्ण होऊन तिचे स्तन पिऊ लागली. कुणी छकडा झाली तर कोणी बाळकृष्ण होऊन रडत त्याला पायाची ठोकर मारून उलटून टाकले. ॥ 15 ॥

## दैत्यायित्वा जहारान्या- मेका कृष्णार्भभावनाम् ।

## रिङ्गयामास काप्यङ्घ्री, कर्षन्ती घोषनिः(स्)स्वनैः ॥ 16॥

कृष्णार् + भभावनाम्

कोणी गोपी बाळकृष्ण झाली तर कुणी तृणावर्त दैत्याचे रूप धारण करून त्याला घेऊन गेली. एखादी गोपी पाय ओढत पैंजण वाजवीत रांगू लागली.॥ 16 ॥

**कृष्णरामायिते द्वे तु, गोपयन्त्यश्च काश्चन ।**

**वत्सायतीं(म्) हन्ति चान्या, तत्रैका तु बकायतीम् ॥ 17॥**

**गोपा+ यन्त्यश्च**

एक कृष्ण झाली तर दुसरी बलराम आणि पुष्कळशा गोपी गोपाळ झाल्या. एक गोपी झाली वत्सासुर ,तर दुसरी झाली बकासुर. मग दुसऱ्या गोपींनी श्रीकृष्ण होऊन वत्सासुर आणि बकासुर झालेल्या गोपींना मारले. ॥ 17 ॥

**आहूय दूरगा यद्वत्- कृष्णस्तमनुकुर्वतीम् ।**

**वेणुं(ङ्) क्वणन्तीं(ङ्) क्रीडन्ती- मन्याः(श्) शं(म्)सन्ति साध्विति ॥ 18॥**

**कृष्णस् + तमनुकुर् + वतीम्**

जसे श्रीकृष्ण बासरी वाजवून लांब गेलेल्या गाईंना बोलावीत, तशी त्यांच्याप्रमाणे एक गोपी वेणू वाजवून खेळू लागली. 'वाहवा! वाहवा!! म्हणून तिची प्रशंसा करू लागल्या. ॥ 18 ॥

**कस्यां(ञ्)चित् स्वभुजं(न्) न्यस्य, चलन्त्याहापरा ननु ।**

**कृष्णोऽहं(म्) पश्यत गतिं(ल्ँ), ललितामिति तन्मनाः ॥ 19॥**

**चलन्त्या+ हापरा**

एक गोपी स्वतःला श्रीकृष्ण समजून दुसऱ्या सखीच्या गळ्यात हात टाकून चालू लागे आणि दुसऱ्या गोपींना म्हणे-"अग! मी श्रीकृष्ण आहे. तुम्ही माझे हे मनोहर चालणे पहा तर खरे!" ॥ 19 ॥

**मा भैष्ट वातवर्षाभ्यां(न्), तत्त्राणं(वँ) विहितं(म्) मया ।**

**इत्युक्त्वैकेन हस्तेन, यतन्त्युन्निदधेऽम्बरम् ॥ 20॥**

**तत् + त्राणं(वँ), इत्युक् + त्वैकेन, यतन् + त्युन् + निदधेऽम्बरम्**

एखादी गोपी श्रीकृष्ण होऊन म्हणे-"अरे व्रजवासीयांनो! तुम्ही वादळ-पावसाला भिऊ नका. त्यापासून वाचण्याचा उपाय मी शोधला आहे."असे म्हणून गोवर्धन उचलून धरल्याची नक्कल करीत ती आपली ओढणी उचलून डोक्यावर दरीत होती. ॥ 20 ॥

**आरुह्यैका पदाऽऽक्रम्य, शिरस्याहापरां(न्) नृप ।**

**दुष्टाहे गच्छ जातोऽहं(ङ्), खलानां(न्) ननु दण्डधृक् ॥ 21॥**

परीक्षिता! एक गोपी दुसरीच्या डोक्यावर पाय ठेवून वर चढून म्हणाली-"अरे दुष्ट सर्पा! तू येथून निघून जा. दृष्टांचे दमन करण्यासाठीच मी जन्माला आलो आहे."॥ 21 ॥

**तत्रैकोवाच हे गोपा, दावाग्निं(म्) पश्यतोल्बणम् ।**

**चक्षूं(म्)ष्याश्वपिदध्वं(वँ) वो, विधास्ये क्षेममं(ञ्)जसा ॥ 22॥**

**चक्षूं(म्)ष्याश्+ वपिदध्वं(वँ)**

इतक्यात एक गोपी म्हणाली-"अरे गोपाळांनो! केवढा भयंकर वनवा पेटला आहे, पहा! तुम्ही ताबडतोब डोळे बंद करा. मी सहजपणे तुमचे त्यापासून रक्षण करीन. ॥ 22 ॥

**बद्धान्यया स्रजा काचित्- तन्वी तत्र उलूखले ।**

**भीता सुदृक् पिधायास्यं(म्), भेजे भीतिविडम्बनम् ॥ 23॥**

एका गोपीने दुसरीला फुलांच्या माळीने उखळाला बांधले. आता ती बांधलेली सुंदर गोपी हाताने तोंड झाकून भ्याल्याची नकल करू लागली. ॥ 23 ॥

**एवं(ङ्) कृष्णं(म्) पृच्छमाना, वृन्दावनलतास्तरून् ।**

**व्यचक्षत वनोद्देशे, पदानि परमात्मनः ॥ 24॥**

**वृन्दावन+ लतास् + तरून्**

अशाप्रकारे खेळत गोपी वृंदावनातील झाडे, वेली इत्यादींना श्रीकृष्णांचा ठाव- ठिकाणा विचारीत जाऊ लागल्या. त्याचवेळी त्यांनी एके ठिकाणी भगवंतांच्या चरणाचे ठसे पाहिले. ॥ 24 ॥

**पदानि व्यक्तमेतानि, नन्दसूनोर्महात्मनः ।**

**लक्ष्यन्ते हि ध्वजाम्भोज-वज्रां(ङ्)कुशयवादिभिः ॥ 25॥**

**नन्दसूनोर्+ महात्मनः, वज्रां(ङ्)+ कुशयवा+ दिभिः**

त्या आपापसात म्हणू लागल्या, "हे चरणांचे ठसे निश्चितच महात्म्या नंदनंदनांचे आहेत .कारण यामध्ये ध्वज, कमळ ,वज्र, अंकुश, जव इत्यादी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. ॥ 25 ॥

**तैस्तैः(फ्) पदैस्तत्पदवी- मन्विच्छन्त्योऽग्रतोऽबलाः ।**

**वध्वाः(फ्) पदैः(स्) सुपृक्तानि, विलोक्यार्ताः(स्) समब्रुवन् ॥ 26॥**

**पदैस् + तत्पदवी, मन्विच् + छन्त्योऽ+ ग्रतोऽ+ बलाः**

त्या पावलांच्या ठशांचा मागोवा घेत. भगवंतांना शोधीत, गोपी पुढे गेल्या. तेव्हा त्यांना श्रीकृष्णांच्या बरोबर दुसऱ्या युवतीची सुद्धा चरणचिन्हे दिसली. ती पाहून त्या व्याकुळ झाल्या आणि म्हणू लागल्या.॥ 26 ॥

**कस्याः(फ्) पदानि चैतानि, याताया नन्दसूनुना ।**

**अं(म्)सन्यस्तप्रकोष्ठायाः(ख्), करेणोः(ख्) करिणा यथा ॥ 27॥**

**अं(म्)सन्यस्+ तप्रकोष्ठायाः(ख्)**

जशी हत्तीण हत्ती बरोबर जावी, त्याचप्रमाणे नंदकुमारांबरोबर त्यांच्या खांद्यावर हात ठेवून चालणाऱ्या कोणत्या स्त्रीची ही चरण चिन्ह असावीत? ॥ 27 ॥

**अनयाऽऽराधितो नूनं(म्), भगवान् हरिरीश्वरः ।**

**यन्नो विहाय गोविन्दः(फ्), प्रीतो यामनयद् रहः ॥ 28॥**

सर्व शक्तिमान भगवान श्रीकृष्णांची ही खात्रीने '(आ )राधिका' असली पाहिजे. म्हणूनच हिच्यावर प्रसन्न होऊन आमच्या गोविंदांनी आम्हाला सोडून हिला एकांतात आणले. ॥ 28 ॥

धन्या अहो अमी आल्यो, गोविन्दाङ्घ्र्यब्जरेणवः ।

यान् ब्रह्मेशो रमा देवी, दधुर्मूर्ध्न्यघनुत्तये ॥ 29॥

गोविन्दाङ् + घ्र्यब्जरेणवः, दधुर्मूर् + ध्न्यघनुत्तये

सख्यांनो! श्रीकृष्णांनी आपल्या चरण कमलांनी ज्या या धुळीला स्पर्श केला की धन्य होय. कारण ब्रह्मदेव, शंकर आणि लक्ष्मी सुद्धा आपले पाप नष्ट करण्यासाठी ती धूळ आपल्या मस्तकावर धारण करतात. ॥ 29 ॥

तस्या अमूनि नः क्षोभं(ङ्), कुर्वन्त्युच्चैः(फ्) पदानि यत् ।

यैकापहृत्य गोपीनां(म्), रहो भुङ्क्तेऽच्युताधरम् ॥ 30॥

कुर्वन्+ त्युच्चैः(फ्), भुङ्क्तेऽ+ च्युताधरम्

जी ही एकटीच एकांतात जाऊन श्रीकृष्णांचे अधरामृतपान करीत आहे, त्या गोपीची ही पावले तर आमच्या मनाला फारच पीडा देत आहे. ॥ 30 ॥

न लक्ष्यन्ते पदान्यत्र, तस्या नूनं(न्) तृणां(ङ्)कुरैः ।

खिद्यत्सुजाताङ्घ्रितला- मुन्निन्ये प्रेयसीं(म्) प्रियः ॥ 31॥

खिद्यत् +सुजाताङ् + घ्रितला

इथे मात्र तिच्या पाऊलखुणा दिसत नाहीत, कदाचित प्रियाने प्रियेच्या सुकुमार तळव्यांना गवताची टोके टोचू नयेत म्हणून तिला आपल्या खांद्यावर घेतले असावे! ॥ 31 ॥

इमान्यधिकमग्नानि, पदानि वहतो वधूम् ।

गोप्यः(फ्) पश्यत कृष्णस्य, भाराक्रान्तस्य कामिनः ॥ 32॥

इमान् + यधिकमग्+ नानि

सख्यांनो! पाहा. येथे कामी श्रीकृष्णांची ही पावले प्रियेला उचलून नेताना झालेल्या ओझ्यामुळे अधिक खोल रुतलेली दिसतात.॥32॥

अत्रावरोपिता कान्ता, पुष्पहेतोर्महात्मना ।

अत्र प्रसूनावचयः(फ्), प्रियार्थे प्रेयसा कृतः ।

प्रपदाक्रमणे एते, पश्यतासकले पदे ॥ 33॥

अत्रा+ वरोपिता ,पुष्पहेतोर्+ महात्मना

पाहा !पाहा! येथे वल्लभाने फुले तोडता यावीत, म्हणून प्रियेला खाली उतरविले आहे आणि इथे त्या प्रियाने प्रियेसाठी फुले तोडली आहेत. टाचा वर करून फुले तोडल्यामुळे इथे त्यांचे पाय पूर्ण उमटले नाहीत. ॥ 33 ॥

केशप्रसाधनं(न्) त्वत्र, कामिन्याः(ख्) कामिना कृतम् ।

तानि चूडयता कान्ता- मुपविष्टमिह ध्रुवम् ॥ 34॥

येथे त्या कामीने आपल्या कामिनीची वेणी घातली असावी! आणि ती फुले तिच्या वेणीत गुंफण्यासाठी ते नक्कीच खाली बसले असतील. ॥ 34 ॥

**रेमे तया चात्मरत, आत्मारामोऽप्यखण्डितः ।**

**कामिनां(न्) दर्शयन् दैन्यं(म्), स्त्रीणां(ञ्) चैव दुरात्मताम् ॥ 35॥**

**आत्मारामोऽ+प्यखण्डितः**

भगवान श्रीकृष्ण आत्माराम असून अखंड स्वतःमध्येच रमलेले असतात. तरीसुद्धा त्यांनी कामीजनांची दीनता व स्त्रियांची पुरुषांना वश करण्याची वृत्ती दाखवण्यासाठी त्या गोपी बरोबर एकांतामध्ये क्रीडा करण्याची लीला केली असावी. ॥35॥

**इत्येवं(न्) दर्शयन्त्यस्ताश्- चेरुर्गोप्यो विचेतसः ।**

**यां(ङ्) गोपीमनयत् कृष्णो, विहायान्याः(स्) स्त्रियो वने ॥ 36॥**

**दर्शयन् + त्यस्ताश्**

**सा च मेने तदाऽऽत्मानं(वँ), वरिष्ठं(म्) सर्वयोषिताम् ।**

**हित्वा गोपीः(ख्) कामयाना, मामसौ भजते प्रियः ॥ 37॥**

अशा प्रकारे बेभान होऊन एकीमेकींना पाऊलखुणा दाखवीत त्या वना -वनात भटकू लागल्या. इकडे श्रीकृष्ण दुसऱ्या गोपींना वनात सोडून ज्या गोपीला एकांतात घेऊन गेले होते, तिला वाटले की,"आपणच सर्व गोपींमध्ये श्रेष्ठ आहोत. म्हणून तर ज्या गोपी त्यांची इच्छा करतात, त्यांना सोडून ते माझे प्रिय श्रीकृष्ण माझ्याबरोबर राहिले.॥ 36-37 ॥

**ततो गत्वा वनोद्देशं(न्), दृप्ता केशवमब्रवीत् ।**

**न पारयेऽहं(ञ्) चलितुं(न्), नय मां(यँ) यत्र ते मनः ॥ 38॥**

वनात गेल्यावर ती गोपी गर्विष्ठपणे श्रीकृष्णांना म्हणाली,"प्रियतमा! माझ्याच्याने आत्ता आणखी चालवत नाही. म्हणून तुम्हाला जिथे जायचे असेल, तेथे मला उचलून न्या. ॥ 38 ॥

**एवमुक्तः(फ्) प्रियामाह, स्कन्ध आरुह्यतामिति ।**

**ततश्चान्तर्दधे कृष्णः(स्), सा वधूरन्वतप्यत ॥ 39॥**

**आरुह्यता+ मिति, ततश् + चान्तर्+ दधे, वधू+ रन्व+ तप्यत**

तिने असे सांगितल्यावर ते म्हणाले,"प्रिये, ठीक आहे. तू माझ्या खांद्यावर बस."आणि एकदम अंतर्धान पावले. तेव्हा मात्र ती गोपी पश्चात्ताप करू लागली.॥ 39 ॥

**हा नाथ रमण प्रेष्ठ, क्वासि क्वासि महाभुज ।**

**दास्यास्ते कृपणाया मे, सखे दर्शय सन्निधिम् ॥ 40॥**

हे नाथा! हे रमणा! हे श्रेष्ठ! हे महाभुजा! आपण कोठे आहात? कोठे आहात? माझ्या सख्या! मी तुमची दीन दासी आहे. माझ्याजवळ या. ॥ 40 ॥

**अन्विच्छन्त्यो भगवतो, मार्गं(ङ्) गोप्योऽविदूरतः ।**

**ददृशुः(फ्) प्रियविश्लेष- मोहितां(न्) दुःखितां(म्) सखीम् ॥ 41॥**

**अन्विच् + छन्त्यो**

भगवंतांच्या जाण्याचा मार्ग शोधित गोपी तेथे जाऊन पोहोचल्या.तेथे जवळच त्यांना दिसले की, प्रियतमाच्या वियोगाने त्यांची सखी दुःखाने बेशुद्ध होऊन पडली आहे. ॥ **41** ॥

**तया कथितमाकर्ण्य, मान*प्राप्तिं(ञ्) च माधवात् ।**

**अवमानं(ञ्) च दौरात्म्याद्, वि*स्मयं(म्) परमं(यँ) ययुः ॥ 42॥**

**कथितमा+ कर्ण्य, दौरात् + म्याद्**

श्रीकृष्णांच्या कडून जो मान प्राप्त झाला होता, तो तिने त्यांना सांगितला आणि आपल्याच गर्वामुळे आपला अवमान झाल्याचेही सांगितले. ते ऐकून गोपींच्या आश्चर्याला पारावर राहिला नाही.. ॥ **42** ॥

**ततोऽविशन् वनं(ञ्) चन्द्र*- ज्योत्स्ना यावद् विभाव्यते ।**

**तमः(फ्) प्रवि*ष्टमालक्ष्य, ततो निववृतुः(स्) स्त्रियः ॥ 43॥**

यानंतर, वनामध्ये जेथे पर्यंत चंद्राचे चांदणे पडले होते, तेथपर्यंत त्या त्यांना शोधित गेल्या. परंतु पुढे अंधार आहे, असे पाहून परत फिरल्या. ॥ **43** ॥

**त*न्मन*स्कास्तदालापास्-त*द्विचेष्टास्तदात्मिकाः ।**

**त*द्गुणानेव गायन्त्यो, नात्मागाराणि स*स्मरुः ॥ 44॥**

**तन्मनस्कास्+ तदालापास्, तद्विचेष्टास्+ तदात्मिकाः, नात्मा+ गाराणि**

गोपींचे मन श्रीकृष्णमय होऊन गेले होते. त्या त्यांच्याविषयीच बोलत होत्या. त्यांच्या हालचाली केवळ श्रीकृष्णांसाठीच होत्या. किंबहुना त्या कृष्णमयच झाल्या होत्या. त्यांच्या गुणांचेच गायन करणाऱ्या त्यांना आपल्या घरांची, इतकेच नव्हे तर शरीराची आठवण राहिली नाही. ॥ **44** ॥

**पुनः(फ्) पुलिनमा*गत्य, कालिन्द्याः(ख्) कृ*ष्णभावनाः ।**

**समवेता जगुः(ख्) कृ*ष्णं(न्), तदागमनकां(ङ्)क्षिताः ॥ 45॥**

श्रीकृष्णांच्याच चिंतनात बुडून गेलेल्या गोपी यमुनेच्या वाळवंटात परत आल्या आणि त्यांच्या येण्याची वाट पहात सर्व मिळून श्रीकृष्णांच्याच गुणांचे गायन करू लागल्या. ॥ **45** ॥

**इति* श्रीम*द्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)**

**दशम*स्क*न्धे पूर्वार्धे रास*क्रीडायां(ङ्) कृ*ष्णान्वेषणं(न्) नाम*त्रिं(म्)शोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुद*च्यते**

**पूर्ण*स्य पूर्णमादाय पूर्णमेवावशि*ष्यते।।**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः।।**